# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ६५१३/२०१९ पुणे शहर, दिनांक- ०५/०८/२०१९

**विषय :- मुळा,मुठा नदीस पूर परिस्थिती निर्माण झाल्याने शहर हद्दीतली नदीवरील पुल वाहतुकीस बंद केले बाबत.**

---

सर्व वाहनचालक/नागरीकांना कळविण्यात येते की, सद्याचे पावसाळ्यामध्ये खडकवासला व पवना धरण क्षेत्रातील सर्व धरणे १०० टक्के भरली असून धरणामधून नदीपात्रांत मोठ्याप्रमाणात पाण्याचा विसर्ग होत आहे.नद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत त्यामुळे शहर हद्दीमधील नदीवरील पुलांवरुन पाणी वाहत असल्याने तसेच सखल भागात पाणी साचल्याने खालील नमूद पुल हे पुरामुळे वाहतुकीस बंद करण्यात आले आहेत.

१) महादजी शिंदे पुल( डीमार्ट औंध ते सांगवी मार्गावरील)

२) राजीव गांधीपुल (औंधगाव ते डांगेचौक मार्गवरील )

३) जुना सांगवी पुल( स्पायसर कॉलेज ते जुनी सांगवी/नवी सांगवी मार्गावरील)

४) दापोडी पुल (भाऊ पाटील रोड ते दापोडीगाव मार्गावरील)

५) जुना होळकर पुल (खडकीबाजार ते साप्रस मार्गावरील)

६) भिडेपुल(डेक्कन)

६) टिळकपुल(खुडेपुल म.न.पा.समोरील)

नमूद पुलांवरील वाहतुक पुर्णपणे दोन्ही बाजूने बंद केली आहे. पुलावरील पाणी कमी झाल्यावर व वाहतुकीस सुरक्षित झाल्यावर सदरचे पुल पुन्हा वाहतुकीस खुले करण्यात येईल.नागरीकांनी वाहतुकीचे सध्याची परिस्थीती समजुन घेणेकरीता punetrafwatch.com वेबपेजवर जावून माहिती घेणे.

तरी वरील नमूद पुलावरुन वाहनचालक नागरीकांनी जाणे-येणे टाळुन पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(सही/-)
पोलीस उप आयुक्त,वाहतुक
पुणे शहर

*प्रत* : सर्व संबंधितांना.